# <u>संक्षिप्त संपरिक्षा</u>

१. खटल्याचा क्र. : २३६२/२०१८ २. गुन्हयाचा दिनांक : २५/०८/२०१८

३. दाखल दिनांक : २७/०८/२०१८ ४. तक्रारदाराचे नांव : इरफान ईरकल .

५. आरोपीचे नांव : अडिवप्पा नागप्पा सोमनाल , वय — २७, रा. बुध्दीहाल , ता. बसवन, बागेवाडी , जि. बिजापुर .

६. गुन्हयाचा तपशिल : दिनांक २५/०८/२०१८ रोजी सकाळी ९.४० वाजता तुम्ही होटगी रेल्वे स्टेशन यार्ड कि.मी. क्रमांक ४६९/८—९ येथे जेसीबी ने काम करताना रेल्वे विभागाच्या ४ वायर खोदकाम करताना क्षतिग्रस्त केल्या व नुकसान केले व त्यामुळे रेल्वे गाडयादेखील उशीर झाला त्यानुसार तुम्ही कलम १७४(क) रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

<u>आरोपीचे निवेदन :—</u>

प्र. १. : तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय
प्र. २. : तुम्हाला आता गुन्हा समजावून व वाचून दाखविला तो समजला काय ?
उत्तर : होय
प्र. ३. : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर : होय
प्र. ४. : तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?
उत्तर : नाही

..............................
आरोपीची सही

दि. २७/०८/२०१८

**प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड**

## <u>आदेश</u>

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केलेला आहे. आरोपीचे असे कथन आहे की, हा त्याचा पहिला गुन्हा आहे. त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असल्यामुळे कमीतकमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केलयाचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखावरुन आरोपीने पूर्वी गुन्हा केल्याचे स्पष्ट होत नाही. तसेच, वादांतील गुन्हा हा जाणीवपुर्वक केलेला नसून, अपघात आहे. आरोपी नुकसान भरपाई देण्यांस तयार आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा व गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ अन्वये भारतीय रेल्वे कायदा कलम १७४(क), या गुन्ह्याकरीता, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ अन्वये दोषी ठरविण्यात येते. आरोपीस भारतीय रेल्वे कायदा कलम १७४(क) या गुन्ह्याकरीता न्यायालय उठेपर्यंत शिक्षा ठोठावण्यात येतो.

२. आरोपीने फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम ३५७(३) अन्वये रेल्वे विभागाला नुकसान भरपाई पोटी रु. १,०५,०००/— (अक्षरी रु. एक लाख पाच हजार मात्र) द्यावेत,.सदर रक्कम भरणेस कसूर केल्यास ६ महिने साधी कारावाची शिक्षा ठोठावणेत येते.

दि. २७/०८/२०१८

**प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड**